प्रेस नोट दिनांक १६/०८/२०१९

## हडपसर पोलीस स्टेशन, पुणे

## खुन करणा-या पाच आरोपीतांना हडपसर पोलीसांकडुन अटक

दिनांक १३/०८/२०१९ रोजी संध्याकाळी ६.३० वा सुमारास स.नं. २२०, दिंगबर कॉलनी, गंगानगर मेन रोड, फुरसुंगी, पुणे येथे फिर्यादी राजेंद्र विजय गुंजाळ, त्यांचा भाऊ मयुर विजय गुंजाळ व त्याचे मित्र सनी गवळी व अदित्य इंगवले असे आपआपसांत बोलत थांबले असताना आरोपी **संजुसिंग पंजाबसिंग कल्याणी, तेजाबसिंग ऊर्फ तेजस शितलसिंग कल्याणी, रोहितसिंग सुनिलसिंग कल्याणी, ओमश्री भंडारी व इतर आरोपीतांनी** यांनी पुर्वी झालेल्या भांडणाचे कारणावरुन पुन्हा भांडणे करुन मयुर यास मारहाण करीत असताना भांडणे सोडविण्यासाठी मध्ये आलेले पंचय्या स्वामी, रा. गंगानगर, फुरसुंगी यांच्यावर आरोपी तेजाबसिंग ऊर्फ तेजस कल्याणी याने पिस्तुल मधुन फायरींग करुन जीवे ठार मारले आहे म्हणुन हडपसर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं. ८०१/२०१९ भादविक ३०२, ५०६ (२), ३४, क्रि. लॉ. अॅ. अॅ. कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

मा. रघुनाथ जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो हडपसर पोलीस स्टेशन पुणे यांनी समक्ष घटनास्थळी भेट देवुन तपास पथकातील अधिकारी सपोनि चव्हाण व पोलीस उप निरीक्षक पाचपुते यांना तपासाबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार तपास पथकातील अधिकारी स.पो.नि. संजय चव्हाण, पो.उपनिरीक्षक पाचपुते व तपास पथकातील कर्मचारी असे वरील नमूद निष्पन्न आरोपीतांचा शोध घेत असताना गोपनीय बातमीदाराकडुन वरील गुन्हयातील पाहिजे आरोपी हे नवीन म्हाडा वसाहत, वैदुवाड

ी, हडपसर, पुणे येथे थांबलेले आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाली. सदर बातमीनुसार तपासपथकातील वरील नमूद पोलीस अधिकारी व स्टाफ यांनी बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन इसम नामे १) संजुसिंग पंजाबसिंग कल्याणी वय ३३ वर्षे रा. संस्कृती कॉलनी नं. १२, गंगानगर फुरसुंगी पुणे,२) तेजाबसिंग शितलसिंग कल्याणी वय २३ वर्षे रा. संस्कृती कॉलनी नं. १२, गंगानगर फुरसुंगी पुणे, ३) रोहितसिंग सुनिलसिंग कल्याणी वय १९ वर्षे रा. महादेव कॉलनी नं. १५, गंगानगर फुरसुंगी पुणे, ४) सागर मोहन चौगुले, वय २३ वर्षे रा. संस्कृती कॉलनी नं. १३, गंगानगर फुरसुंगी, पुणे, ५) ऋतिक अशोक दंडनवरे वय २० वर्षे रा. संत रोहिदास कॉलनी, गल्ली नं. ११, गंगानगर फुरसुंगी, पुणे, यांना पकडुन त्यांचेकडे सदर गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्यांनी त्यांचे इतर साथीदारांसह दाखल गुन्हा केला असल्याचे कबुली दिली. तेव्हा वरील नमूद आरोपीतांना हडपसर पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्हयात दिनांक १५/०८/२०१९ रोजी २१.३० वाजता अटक करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. सुनील फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त , परिमंडळ ५ पुणे शहर व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा. रघुनाथ जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस ठाणे पुणे, यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक श्री. संजय चव्हाण, पोलीस उप निरीक्षक तुषार पाचपुते, सहा.पो.फौजदार युसुफ पठाण, पो.हवा. संपत औचरे, पो.हवा. बाळासाहेब सोनवणे, पो.हवा. राजेश नवले, पो.ना. प्रताप गायकवाड, पो.ना. सैदोबा भोजराव, पो.ना. विनोद शिवले, पो.ना. गणेश दळवी, पो.शि.अनिल कुसाळकर, पो.शि. अकबर शेख, पो.शि. शंशीकांत नाळे, पो.शि. गोविंद चिवळे, पो.शि. अमित कांबळे, पो.शि. ज्ञानेश्वर चित्ते, पो.शि. विजय पवार यांनी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास रघुनाथ जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस स्टेशन, पुणे हे करीत आहेत.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**